# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-४३/२०२५ दिनांक- २८/०१/२०२५

## प्रेस नोट

### अनाधिकृतरित्या काशिगांव पोलीस ठाण्याचे हद्दीत वास्तव्यास असलेल्या दोन बांगलादेशी पुरुष नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २७/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत काशिगांव पोलीस ठाण्याचे हद्दीतील न्यु सालासर ऑर्चीड टॉवरचे लगत असलेल्या पानगादी जवळ काशिमीरा या ठिकाणी बांगलादेशी नागरीक असल्याची बातमी मिळाली असून ते विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी १५.३० ते १६.३० वा. सुमारास साफळा रचुन ०२ पुरुष बांगलादेशी नागरीकांना पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत, त्यांनी बांगलादेशी नागरीक असल्याची कबुली दिल्याने सदरबाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे यांनी सविस्तर पंचनामा केला असुन ताब्यात घेतलेल्या बांगलादेशी नागरीकाविरुध्द पोशि/ केशव निवृत्ती शिंदे यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिगांव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ५१/२०२५, पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४-अ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास

हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पोशि/केशव शिंदे, मपोशि/अश्विनी भिलारे, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर यांनी केली आहे.




------ooooo-----